**महापारेषण**
**महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित**
**मानव संसाधन विभाग**
प्रकाशगंगा, प्लॉट नं. सी- ११, इ-ब्लॉक, २ रा मजला, वांद्रा-कुर्ला-कॉम्प्लेक्स, वांद्रा (पूर्व), मुंबई-४०००५१.
फोन नं.(०२२) २६५९८५९५/ २६५९५००० फॅक्स (०२२) २६५९८५८७/२६५९२००१

क्र. मराविपाकंम/सांका/मासं/क्लेम्स/

# प्रशासकीय परिपत्रक क्र.३१६ दिनांक १२.०४.२०१२

महाराष्ट्र शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णयाच्या आधारे तत्कालीन म.रा.वि.मंडळाच्या पुनर्रचित कंपनीच्या कर्मचाऱ्यांसाठी सुधारित दराने महागाई भत्ता मंजूर केला जातो.

२. शासन निर्णय वित्त विभाग क्र.मभवा-१११२/प्र.क्र.१५/सेवा-९ दिनांक ०१.०४.२०१२ अन्वये दिनांक ०१.०१.२०१२ पासून शासकीय कर्मचा-यांना अनुज्ञेय महागाई भत्ताचा दर ५८% वरुन ६५% करण्यात यावा व दिनांक ०१.०४.२०१२ पासून सदर महागाई भत्त्याच्या वाढीची रक्कम रोखीने देण्यात यावी. तसेच, दिनांक ०१.०१.२०१२ ते ३१.०३.२०१२ या कालावधीतील महागाई भत्त्याच्या थकबाकीच्या आहरणाबाबत स्वतंत्रपणे आदेश निर्गमित करण्यात येतील असा निर्णय घेतला आहे.

३. शासनाच्या धर्तीवर म.रा.विद्युत पारेषण कंपनी मर्यादित मधील सर्व कर्मचाऱ्यांना ५८% ऐवजी ६५% दराने दिनांक ०१.०४.२०१२ पासून महागाई भत्यात वाढ देण्याबाबत कार्यकारी संचालक (मा.सं.) आणि संचालक (वित्त) यांच्याशी विचार विनिमय करुन अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, म.रा.विद्युत पारेषण कंपनी मर्यादित यांनी मंजुरी दिली आहे.

४. सुधारित महागाई भत्ता माहे एप्रिल, २०१२ च्या वेतनापासून देण्यात यावा.

५. दिनांक ०१.०१.२०१२ ते ३१.०३.२०१२ या कालावधीतील महागाई भत्त्याच्या थकबाकीची रक्कम अदा करण्याबाबत शासनाच्या निर्णयानुसार स्वतंत्रपणे निर्णय घेण्यात येईल.

६. संबंधित अधिकाऱ्यांना विनंती करण्यात येते की, त्यांनी महागाई भत्त्याची वाढीव रक्कम प्रदान करण्यासाठी आवश्यक असलेल्या निधीसाठी श्री.आर.जे. पवार, सहाय्यक महाव्यवस्थापक (वित्त व लेखा) यांचेकडे वरील पत्त्यावर त्वरित मागणी करावी.

७. उपरोक्त प्रशासकीय परिपत्रक महापारेषण कंपनीच्या www.mahatransco.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यांत आले आहे.

(विजय मा.लाटे)
कार्यकारी संचालक (मा.सं.)

प्रती,
म.रा.विद्युत पारेषण कंपनी मर्यादितच्या
मुख्य कार्यालयातील व क्षेत्रिय कार्यालयातील प्रेषण यादीप्रमाणे.

D:\com mould rivele drive data\PAY-BILL-OR1\Circular.doc